## Quadrant II – Transcript and Related Materials

**Programme:** BA

**Subject:** Marathi

**Paper Code:** MRD-105

**Paper Title:** **A Study of Modern Marathi Author (B. B. Borkar)**
एका लेखकाचा अभ्यास (बा.भ. बोरकर)

**Unit:** चांदणवेल

**Module Name**: बा.भ.बोरकर यांची प्रेमविषयक व निसर्गविषयक कविता.

**Module No:** 02

**Name of the Presenter: Dr. Geeta Yerlekar**

---

**Transcript**

नमस्कार, आज आपण बा. भ. बोरकर यांची प्रेमविषयक व निसर्गविषयक कविता समजून घेणार आहोत.

कवी बा. भ. बोरकर यांची कविता वैविध्यपूर्ण आहे. हे वैविध्य तिच्या आशय आणि आविष्कारात दडलेले दिसते . कुसुमाग्रज आणि गो. म. कुलकर्णी संपादित 'चांदणवेल' या बोरकरांच्या निवडक कवितेवरील संपादनात वेगवेगळ्या आशयाच्या कविता संग्रहित आहेत. उदा. निसर्गविषयक, प्रेमविषयक, आध्यात्मिक, काव्यविषयक, सामाजिक, गोव्यासंदर्भात इ. यातील निसर्गविषयक आणि प्रेमविषयक कवितांचे स्वरुप या घटकाच्या निमित्ताने समजून घ्यायचे आहे.

निसर्ग आणि प्रणय या दोन्हीचा उत्कट अनुभव बोरकरांच्या कवितेतून येतो. निसर्ग व प्रणय यांची बोरकरांच्या कवितेतील अनुभूती सर्जनशील व ऐंद्रिय स्वरुपाची आहे. त्याच्या एकूणच कवितेची निसर्ग आणि प्रेम ही दोन केंद्र आहेत.

**बा. भ. बोरकर यांच्या निसर्ग कवितेची वैशिष्ट्ये**

बालपणापासून मनावर झालेला गोव्यातील निसर्गाचा संस्कार त्यांच्या साहित्याचा महत्त्वाचा भाग आहे. गोमंतकाच्या निसर्गसंपन्न प्रदेशातील विलोभनीय दृश्ये त्यांनी आपल्या नजरेने टिपली. त्याचं मूर्त आणि सौंदर्याने संपन्न असं रुप बोरकरांच्या कवितेत विखूरलेलं आहे. त्यांच्या कवितेतील

सृष्टी वर्णनाचे सामर्थ्य विलक्षण आहे. बोरकरांच्या सुरुवातीच्या निसर्गकवितेवर बालकवींचा संस्कार आहे. मात्र त्यांची नंतरची निसर्ग कविता स्वतंत्र असलेली दिसते. सुरुवातीच्या काळात बालकवींच्या संस्कारातून जेव्हा बोरकरांनी निसर्गकविता लिहिली तेव्हा निसर्ग हा त्यांच्या कवितेचा एक विषय होता; परंतु जेव्हा निसर्ग हा त्यांच्या भावानुभूतीचा, प्रतीतीचा विषय झाला तेव्हा ही कविता पूर्णपणे बदलली. "माझ्या भावविश्वाच्या जलाशयात भोवतालच्या निसर्गाचं प्रतिबिंब आपोआप पडतं आणि त्याला एक आगळीच तरलता प्राप्त होते. जेव्हा जेव्हा भाववृत्तीच्या तीव्रतेनं मी झपाटला जातो, मंतरल्यागत होतो तेव्हा माझ्या संवेदना आपोआपच जाग्या होतात आणि त्या आपलं प्रतिमाविश्व उभं करतात. एकाएका निसर्गाच्या आत्मीय भागाशी माझी तार जमते आणि त्याच्या माझ्यात अत्यंत निकटचं असं हृदयंगम कम्युनियन निर्माण होतं."

बोरकर निसर्गाकडे पाहतात तेव्हा त्यांना निसर्ग सुटा, वेगळा जाणवत नाही. संवेदना वा भाववृत्ती जागवणाऱ्या प्रतिमांतूनच बोरकरांना निसर्ग दिसतो. निसर्ग हा बोरकरांच्या कवितेची भाषा आहे. प्रत्येक भाव, प्रत्येक अनुभूती निसर्गप्रतिमांमधून गोचर केली आहे. झाडे, चांदणे, चंद्र, तारका, मेघ, आकाश, नद्या , ऊन इ. असंख्य रुपांनी भोवती वावरणारा निसर्ग बोरकरांच्या कवितेत येतो. आनंदाचा, चैतन्याचा आणि सौंदर्याचा अक्षय, अविनाशी प्रत्यय देणाऱ्या निसर्गाची विलक्षण रुपे त्यांच्या कवितेत पहायला मिळतात. निसर्गातील रंगांच्या असंख्य छटा बोरकर रंगवितात. निसर्गाशी असणारी तन्मयता, उत्कट प्रेम यातून व्यक्त होते. निसर्गाचे नित्यनूतन कला दाखविणारे लावण्य, त्याची सर्जनशीलता, त्याच्यातील शांतविण्याची शक्ती ह्या सर्व गोष्टींचे बोरकरांना अप्रुप वाटते. निसर्गाच्या सानिध्यात त्यांच्या भाववृत्ती खुलून येतात. तीव्र अशा उन्हाळ्यानंतर आकाशात निळे ढग येऊ लागतात. त्यावेळी साऱ्या स्थिर चरामधली तृष्णा जागी होते. ते ढग येऊ लागल्यापासून ते टप् टप् थेंब पडेपर्यंत सर्व चराचरात जी अवस्थांतरे होतात याचाच चलतपट 'जलद भरुनि आले' या कवितेत आला आहे. आकाशात भरुन आलेले गडद निळे मेघ बघून बोरकरांची काव्यसृष्टी फुलते. संपूर्ण चराचरात होणारे हे बदल आणि त्यांचे मनावर उमटणारे चित्र ते शब्दातून सुंदर तऱ्हेने रेखाटतात. प्रतीक्षा ते तृप्ती यामधली प्रत्येक क्षण तितक्याच ताकदीने बोरकर या कवितेत विणतात. हा प्रतीक्षेचा आणि तृप्तीचा क्षण कवीमनाबरोबरच संपूर्ण सृष्टी अनुभवतिये.

उदा. पद्मरागवृष्टि होय माड भव्य न्हाले, धुंद सजल हसित दिशा, मंदाकिनीवरुनि धवल विहगवृंद डोले, हिरव्या तटिं नावांचा कृष्ण मेळ खेळे, मीन चमकुनी उसळे, ढोर पथीं अचल चकित.

सगळेजण आपले भान विसरुन तृप्तीच्या क्षणाची आतुरतेने वाट पाहताहेत असे मनोहारी दृश्य बोरकर रंगवितात. सगळयांची दृष्टी आकाशाकडे लागली आहे आणि तोच प्रतिक्षेचा क्षण संपून जातो,

टप टप टप पडतिं थेंब

मनिंवनिंचे विझति डोंब

वत्सल ये वास, भूमि आशीर्वच बोले.

‘सरिंवर सरी आल्या ग’ या कवितेने कोसळणाऱ्या पावसाच्या विलोभनीय रुपातून आणि गोकुळातल्या रासक्रिडेच्या शब्दातून घडणाऱ्या मूर्त दर्शनातून एक उंची गाठली आहे. तना-मनात एक लय साधून राहणारा क्षण बोरकर या कवितेतून जिवंत करतात.

घनांमनांतुन टाळ-मृदंग

तनूंत वाजवि चाळ अनंग

पानें पिटिती टाळ्या ग

सरिंवर सरी आल्या ग

जळात मल्हाराची धून आहे, विजाही चमकताहेत, वनातला मोर भिजून गेलाय, गोपीही थिजून उभ्या आहेत तरी कृष्ण काही येत नाही. पुढच्या ओळी या साऱ्या वातावरणातील नाजूक क्षणाला स्वतःच्या कोंदणात बसवू पाहतात,

वेली ऋतुमति झाल्या ग

सरिंवर सरी आल्या ग

सगळं मीपण विसरुन एकरुप होऊन एकात्मतेची अवीट गोडी घेण्याच्या क्षणाला शेवटी, ‘मी-तू-पण सारे विसरुन, आपणही जाऊ मिसळून’ या अद्वैताचा उच्चार कवी करतो.

‘मुशाफिरा’ या कवितेत बोरकर एकाकी प्रवासाची भयाणता व्यक्त करतात. साऱ्या सृष्टीलाही असह्य करणारा एकटेपणा आणि हळूवार प्रेमाची जाणीव या कवितेतून येते. संध्याकाळचे वर्णन आणि याच सांजवेळी प्रेमिकांच्या मनातील हुरहुरही व्यक्त होते.

काळवंडलीं जळें चिंचही न सळ् सळे

वाटतें भयाण सर्व!सलत आंत कातरा

कवितेत निसर्गाचा वावर कशातऱ्हेने येतो याचे उत्तम उदाहरण बोरकरांची ही कविता आहे . यातील निसर्गाला अद् भूतता, गूढतेचा झालेला स्पर्श . या मुशाफिराची आकृती एखाद्या स्वप्नासारखी धूसर आहे ही धूसरताच या कवितेचे अवीट सौंदर्य आहे. ‘बांगड्या’ या केवळ स्त्रियांच्या हातात घालायचा अलंकार नाही त्याला सांस्कृतिक अंग आहे. बांगड्यांच्या किणकिणाटाच्या मागे भारतीय स्त्रीजीवनातील असंख्य सूर आहेत. पूर्वी श्रावण महिन्यात बांगड्या

घालण्याची प्रथा असे कारण श्रावणापासून स्त्रियांचे सणसोहळे सुरु होत याचा संदर्भ या कवितेला आहे. श्रावण आणि बांगड्यांचं असणारं अनोखं नातं याठिकाणी उलगडले आहे.

बांगड्या बघा या, श्रावण लावण्यराज लागला फुलाया

या कवितेत रंगछटांचे आणि कल्पनांचे नयनमनोहर वैभव त्यांनी उभे केले आहे ते पाहण्यासारखे आहे. रंगप्रतिमा आणि स्पर्शप्रतिमा विलक्षण प्रभावी आहे. रंगांची कितीतरी वलये ही कविता उभी करते. त्यात जांभळी, श्यामल, मेघ-वर्णाची, निळी, तांबुस, स्वच्छ हिरवी अशी रंगांची संगती दिसते. निसर्ग आणि रंगसंगती याचं एक अनोखं मिश्रण आणि त्यातून निर्माण होणारं एकत्व या कवितेतून दिसते.

क्षितिजासम या जांभुळ, जलदांसम या श्यामल,

वत्सल या गंगेतिल, सांध्य-मेघ-छाया

बोरकरांची कल्पनाशक्ती, सुक्ष्म निरीक्षणशक्ती व कोणतीही जाणीव अचूकपणे शब्दबद्ध करण्याचे त्यांचे कौशल्य या कवितेत ठळकपणे दिसते. या कवितेत रंगछटांचे आणि कल्पनांचे नयनमनोहर वैभव त्यांनी उभे केले आहे.

निसर्गकविता पाहिल्यानंतर आता आपण त्यांची प्रेमविषयक कविता समजून घेऊ.

- **बा. भ. बोरकर यांच्या प्रेम कवितेची वैशिष्ट्ये**

बोरकरांच्या कवितेत प्रेमाइतकी व्यापक दुसरी कोणतीही भावना नाही. बोरकर तांबे सांप्रदायिक कवी होते. बोरकरांच्या प्रेमकवितेचे नाते तांब्यांशी आहे. सुरुवातीची त्यांची कविता तांब्यांच्या जातीची असली तरी नंतर मात्र स्वतःचा वेगळा मनोधर्म व गंध प्रकट करणारी ठरली. बोरकरांची प्रेमकविता ही अधिक मुक्त प्रणयभावनेचा निःसंकोच आविष्कार करणारी व संवेदनाधिष्ठित आहे. स्त्रीविषयक आकर्षणाचे मानसिक व शारीरिक पातळीवरचे प्रीती व रती हे दोन भाव बोरकरांच्या कवितेत सारख्याच उत्कटतेने व्यक्त होतात. एकाहून एक सरस, मधुर, उत्कट प्रेमकविता बोरकरांनी लिहिल्या. हळव्या, कातर प्रीतिभावापासून तो धुंद उत्तान शारीर प्रणय भावापर्यंतच्या प्रीतीच्या अनेक छटा या कवितांत आढळतात. जीवनातल्या सौंदर्यमयतेची आणि आनंदमयतेची प्रतीती बोरकरांना जशी निसर्गातून होते तशीच स्त्रीरुपातूनही होते. त्यामुळे निसर्ग आणि स्त्री या दोन्हींमध्ये त्यांना एक विलक्षण गुढ नाते जाणवते. कधी स्त्रीसौंदर्य आणि निसर्गसौंदर्य यांच्या छटा एकमेकीत मिसळून जातात. कधी निसर्गाच्या रुपातून स्त्रीसौंदर्याचे दर्शन घडते तर कधी स्त्री रुपातून निसर्ग रुप प्रतीत होते. बोरकरांच्या कवितेत निसर्गातून प्रकटणारी ही स्त्री संपूर्णपणे पार्थिव आहे. इतकेच नव्हे तर स्त्रीशी निगडीत असणाऱ्या इंद्रियनिष्ठ सुखसंवेदना वा भावना जागवणारी आहे.

प्रेममग्न प्रेयसीचे रुप 'पाठमोरी पौर्णिमा' या कवितेत पहायला मिळते. पाठमोरी उभी असलेल्या स्त्रीच्या शरीरसौष्ठवाने कवी मोहीत होतो व तिने वळून आपल्याला सामोऱ्या सौंदर्याचे दर्शन द्यावे अशी कवीच्या मनात गोड भावना निर्माण होते. सुरुवातीला तिचा केशसंभार आषाढातला मेघ होऊन फुलांच्या मार्दवाने मानेवर भारावतो. हा गोडवा वाढवीत पण त्याचबरोबर त्याचे उन्नयन करत एकामागून एक निसर्गाच्या प्रतिमा ह्या कवितेत येतात. तिच्या मानेचा खुला भाग विजेच्या चंद्रम्याची आठवण करुन देतो आणि तिने परिधान केलेले निळे वस्त्र,

कान्तिपाने धुंद झाले गर्द हे नीलांबर

पोत-छे! स्वर्जान्हवीचा झोत हा पाठीवर

अंगठीतला निळ लगेच रम्य संध्यातारक होतो. या कवितेत निसर्ग प्रतिमांच्या आधारे मूळ अनुभवाला उत्तान आणि मादक केले आहे. निसर्गप्रतिमांच्या साहाय्याने प्रेममग्न प्रेयसीचे रुप बोरकर या कवितेत रंगवितात.

पाठमोरी तूं बिजेची रात्र, लावण्यें रमा

हासुनी पाहीं वळोनी, होउं दे ना पौर्णिमा

शृंगाराचे एक धुंद, रंगेल आणि स्पष्ट शारीर रुप बोरकरांच्या 'जपानी रमलाची रात्र' या कवितेत दिसते. हळूहळू चढत जाणाऱ्या रतिभावाचे स्वरुप, या कवितेतील अनुभवाचे वर्णन करताना ते प्रत्येक शब्द असा वापरतात की ज्यामुळे त्यावास्तूला, अनुभवाला सौंदर्य आणि एक मायावी गूढता प्राप्त होते. कवितेमधील रंगप्रतिमा आणि स्पर्शप्रतिमा विलक्षण प्रभावी आहे. कविप्रतिभेने उभारलेली मयसृष्टी आणि त्यातून चितारलेले रतिचित्र या कवितेत येते. रसरुपस्पर्शगंधादी संवेदनांना गोचर करण्याची बोरकरांच्या शब्दकळेची किमया या कवितेत उत्कर्ष गाठताना दिसते. बोरकरांची प्रतिमासृष्टी त्या निळया विजेच्या दिव्याचे चांदपाखरु करुन टाकते. ते दीपराग गाऊ लागते. त्यामुळे शयनमहालात निळीचांदरात निर्माण होते.

तुझें विजेचें चांदपांखरुं दीपराग गात

रचीत होतें शयनमहालीं निळी चांदरात

रतिरत कुक्कुटसा कुंडीवर आरोहुनि माड

चोंच खुपसुनी फुलवित होता पंखांचें झाड

सुरुवातीला एक विलक्षण भारलेले वातावरण बोरकर उभे करतात. जगाचा ताप विसरायला लावणारी धुंदी या क्षणात बोरकर पकडतात ते अचंबित करायला लावणारे आहे. तिच्या येण्याने वातावरणातच धुंदी कशी भरुन राहते.

स्पर्शें तुझिया आणि पियानो थरारला सारा

मजसम त्याच्या कानशिलांच्या झणाणल्या तारा

गंधर्वांच्या दुहिता जमल्या करित पुष्पवृष्टी

हृदय मदाचें मोहळ झालें जडावली दृष्टी

'डाळिंबीची डहाळीशी' या कवितेत स्त्री सौंदर्याचे वर्णन तसेच मिलनासाठी अतुर असलेल्या प्रियकराच्या मनाची स्पंदने चित्रित केली आहेत. कवितेतून भावनांची उत्कट रुपे जिवंत झालेली दिसतात. प्रेमदृष्टी, निसर्गदृष्टी , संवेदनांचे विलक्षण जग आणि कविमनाची नितळ , कोवळी थरारी अशा परिसस्पर्शाने संपूर्णतया भारावलेली आहे. सोनकेतकीचे नाते प्रेयसीच्या हसण्याशी जुळते. निसर्ग आणि प्रेम याच्यातील अद्वैत या कवितेतून व्यक्त होते. यातील नाद , लय, संगीत आणि अनुभवांच्या गाभ्यातील अलवारपणा टिपण्याची क्षमता विलक्षण आहे.

नको चांफ्याच्या श्वासांनीं संगे चालतां लगटूं

गर्द झाडींत विजेचें नको लाघव प्रगटूं

स्त्रीसौंदर्याचे येणारे वर्णन तसेच निसर्ग प्रतिमांचा घेतलेला आधार यातून हे सौंदर्य अधिक खुलत जाते. पुढच्या क्षणाला मिलनासाठी अतुर असलेल्या प्रियकराचे मन आणि त्याच्या मनातील भितीही तितक्याच ताकदीने बोरकर चित्रीत करतात.

नको फळत्या वयांत घेऊं संयमाचें माप

वर दिलास, तयाचा नको करुं अभिशाप

'फांद्यांमधुनी चंद्र दिसावा' या कवितेत प्रेमाची हुरहुर, अतुरता आणि वैराग्य या वेगवेगळया भावना एकत्रितपणे व्यक्त झाल्या आहेत. मुळयांतुनी घुसळावें पाणी , पाषाणाला स्वप्न पडावे , खुळी कळयांना यावी डुलकी इ. कवीमनातील प्रेमाची भावना निसर्ग संवेदनेसह येते त्यावेळी ती भावना अधिक खुलताना दिसते.

तुझ्या व्यथेनें होतां व्याकुळ

'तिळा 'अचानक उघडा व्हावा

जवळ अशी तूं असतांनाही

तसाच पुन्हा विसर घडावा.

प्रेमाची हुरहुर समाप्त होण्याचा क्षण जवळ येताच वैराग्याने ग्रासणे ही एक तीव्र वेदना अस्वस्थ करुन जाते.

फांद्यांमधला चंद्र तेधवां

पानांमागें जरा दडावा

डोळयांमधला थेंब तुझ्या अन्

माझ्या खांद्यावरी पडावा.

बोरकरांच्या कवितेत प्रेमभावना आणि निसर्गभावना प्रभावीपणे व्यक्त झाल्या आहेत. बोरकरांच्या कवितेच्या केंद्रस्थानी निसर्ग आणि प्रेम हे विषय प्रामुख्याने दिसतात. बोरकरांच्या कवितेतील निसर्गजाणीव आणि प्रेमजाणीव सौंदर्याच्या अनेकांगी छटांनी रंगलेली आहे. स्पर्श, रुप, रस, गंध यांच्या गोचर प्रतिमा निर्माण करुन त्या सुंदर गीतानुकूल चालीत गोवणे हे बोरकरांचे विशेष. बोरकरांची तरल संवेदनशीलता आणि निसर्गप्रतिमांच्या भाषेतून व्यक्त केलेला प्रेमभाव हे त्यांचे खरे वैशिष्ट्य आहे.

<u>संदर्भग्रंथः</u>

१. कुसुमाग्रज, कुलकर्णी, गो. म. (संपा.); *चांदणवेल*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे,१९७२.

२. गणोरकर प्रभा; *बाळकृष्ण भगवंत बोरकर*, साहित्य अकादमी, मुंबई, १९९०.

३. गणोरकर प्रभा; *बोरकरांची निवडक कविता*, साहित्य अकादमी, मुंबई, २००८.

४. नाडकर्णी, एस्. एस्. (संपा.) ; *बोरकर काव्यसमीक्षा (१९३७-२००८),* कला व संस्कृती संचालनालय, गोवा, २०१०

धन्यवाद.